पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिति

कार्यपत्रिका क्रमांक - ६०

सभावृत्तांत

दिनांक - १४/०५/२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १४/०५/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जगताप नवनाथ दत्तू - सभापती
२) मा. चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
३) मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा. जगदीश शेटटी
५) मा. अरुणा दिलीप भालेकर
६) मा. वाघेरे सुनिता राजेश
७) मा. महेशदादा किसन लांडगे
८) मा. बारणे माया संतोष
९) मा. कदम सदगुरु महादेव
१०) मा. भोंडवे संगिता राजेंद्र
११) मा. शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.झुरे – सह आयुक्त, मा.कारचे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.टेकाळे, मा.दुरगुडे, मा.फुंदे – सहाय्यक आयुक्त, मा.घाडगे- मुख्य लेखापरीक्षक, मा.गावडे - नगरसचिव, मा.सुरगुडे,- विकास अभियंता, मा.गायकवाड – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.भदाणे- उपसंचालक (नगररचना) मा.दुधेकर, मा.निकम, मा.काची, मा.कुदळे मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.थोरात, मा.सय्यद ,मा.साळवी, मा.लडकत, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, – कार्यकारी अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.भोसले – प्रशा. अधिकारी, मा.चव्हाण –आरोग्य कार्यकारी अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.आशा शेंडगे                                   अनुमोदक – मा चंद्रकांत वाळके

स्थायी समितीची सभा मंगळवार दि.२१/५/२०१३ रोजी दु.२.४५ पर्यंत तहकुब करणेत यावी

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती - मंगळवार दिनांक २१/५/२०१३ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(नवनाथ दत्तू जगताप)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ६०

सभावृत्तांत

(दिनांक १४/५/२०१३ ची तहकूब सभा)

दिनांक - २१/०५/२०१३ वेळ - दुपारी २.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक १४/५/२०१३ ची तहकूब सभा मंगळवार, दिनांक २१/०५/२०१३ रोजी दुपारी २.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
२) मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर
३) मा. सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
४) मा. वाघेरे सुनिता राजेश
५) मा. महेशदादा किसन लांडगे
६) मा. बारणे माया संतोष
७) मा. धराडे शकुंतला भाऊसाहेब
८) मा.कदम सदगुरु महादेव
९) मा. भोंडवे संगिता राजेंद्र

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी,.मा.झुरे-सह आयुक्त, मा.पवार,मा.कुलकर्णी,मा.ढेरे,मा.फुंदे - सहा आयुक्त, मा.घाडगे- मुख्य लेखापरीक्षक, मा.गावडे - नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे,- विकास अभियंता,मा.तुपे – सहशहर अभियंता, मा.पवन साळवे – अति.वैद्य. अधिकारी, मा.भदाणे- उपसंचालक (नगररचना) मा.दुधेकर, मा.ढगे,मा.निकम, मा.काची, मा.कुदळे मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.थोरात, मा.सय्यद ,मा.साळवी, मा.लडकत,मा.बरशेट्टी, मा.खाबडे,मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक - मा.सदगुरु कदम

सभा भरविणेकामी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नसलेने मा.माया संतोष बारणे यांची सभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

( मा. बारणे माया संतोष यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

-------------

मा.सदगुरु कदम:- मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३३४८ दिनांक ७/५/२०१३ ला दिलेली उपसुचना रद्द करण्यात यावी व मा.आयुक्त यांचे प्रस्तावानुसार तीन महिने कालावधी करीता मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी देण्याची दुरुस्ती करणेत यावी.

मा.सभाध्यक्ष :- मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३३४८ दिनांक ७/५/२०१३ ला दिलेली उपसुचना रद्द करण्यात येवुन मा.आयुक्त यांचे प्रस्तावानुसार तीन महिने कालावधी करीता मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी देणेत आल्याचे व त्या दुरुस्तीसह दिनांक ७/५/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ५९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभाध्यक्ष यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक – ३३६४ विषय क्रमांक – १

दिनांक – २१/५/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.स्था/नि/४ड/कावि/१२४/२०१३दि.२५/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२०१२-१३ मधील अ.क्र.८२ अन्वये, प्रभाग क्र.४८ (जुना वॉर्ड क्र.७६) मधील ठिकठिकाणी डी.पी.व नॉन डी.पी. रोडच्या कडेने फुटपाथ करणेकामी मे.के.पी. कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.४०,५४,१५५/- [र.रू.चाळीस लाख चोपन्न हजार एकशे पंचावण्ण] पेक्षा १९.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३४,०५,९१६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३६५ विषय क्रमांक – २

दिनांक – २१/५/२०१३ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/३७६/२०१३ दि.३०/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

आनंद मेडिकल फौंडेशनचे नर्सिंग इन्स्टिटयुट या संस्थेबरोबर नर्सिंग कोर्ससाठी १ वर्षासाठी करारनामा करणेस व संस्थेकडून वायसीएमएच रुग्णालय व भोसरी रुग्णालय या दोन रुग्णालयांसाठी र.रु.५,०००/- प्रत्येकी असे एकूण र.रु १०,०००/- अनामत जमा करणेस व आर.ए.एन.एम. चे ४० विद्यार्थ्यांसाठी व आर.जी.एन.एम. चे २० विद्यार्थ्यांसाठी

अशा एकूण ६० बेडस साठी प्रतिदिन प्रतिखाट र.रु.१०/- आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३६६ विषय क्रमांक – ३
दिनांक – २१/५/२०१३ विभाग – ड प्रभाग रहाटणी
सुचक – चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.डप्र/१७/कावि/१४५/२०१३ दि. २/५/२०१३.

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.७/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, प्रभाग क्र.८८ येथे ठिकठिकाणी स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.नंदेश्वरी कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू. ८,४०,०४०/- [र.रू.आठ लाख चाळीस हजार चाळीस] पेक्षा ३६.०१% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३६७ विषय क्रमांक – ४
दिनांक –२१/५/२०१३ विभाग – जनतासंपर्क व स्वागत कक्ष
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जसं/१/कावि/३४५/२०१३ दि.२६/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे विविध विषयांवरील देखाव्यांच्या स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या स्पर्धे अंतर्गत विजेत्या मंडळास धनादेशाद्वारे बक्षिसांची रक्कम अदा करुन व प्रशस्तिपत्रक देवून सत्कार केला जातो. त्याप्रमाणे यावर्षीही सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. याकरीता थेट पध्दतीने र.रु.२,२०,५००/- (अक्षरी र.रु. दोन लाख वीस हजार पाचशे ) इतका खर्च झालेला आहे. तसेच स्पर्धेच्या परिक्षण समितीचे मानधन, चहापान, भोजन इ. व्यवस्थेकरीता व गणेशविसर्जनाचे दिवशी पत्रकारांचे भोजन व्यवस्थेकरीता र.रु. ४२,२६२/- (अक्षरी र.रु. बेचाळीस हजार दोनशे बासष्ट फक्त) इतका खर्च झाला असून या दोन्ही खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३६८ विषय क्रमांक – ५
दिनांक – २१/५/२०१३ विभाग – जनतासंपर्क व स्वागत कक्ष
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जसं/५/कावि/२३८/२०१३ दि.२६/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची महाराष्ट्र विधानमंडळ लोकलेखा समितीसमवेत बैठक दि.९/१/२०१३ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे याठिकाणी झाली.

त्यावेळी मान्यवरांची चहापान, नाष्टा इ. व्यवस्था हॉलीडे इन या हॉटेलमध्ये करण्यात आली होती. याकामी र.रु.३६,२७२/- (र.रु. छत्तीस हजार दोनशे बाहत्तर) इतका खर्च झाला असून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३६९ विषय क्रमांक – ६

दिनांक – २१/५/२०१३ विभाग – नगरसचिव

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नस/२/कावि/२३६/२०१३ दि.३०/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.सेक्रेटरी, अखिल भारतीय महापौर परिषद, नवी दिल्ली यांचेकडील पत्रानुसार अखिल भारतीय महापौर परिषदेची सन २०१३-१४ ची वार्षिक वर्गणी र.रू.२०,०००/- (र.रू.वीस हजार) त्यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३७० विषय क्रमांक – ७

दिनांक – २१/५/२०१३ विभाग – आरोग्य मुख्य कार्या.

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमुका/३/कावि/२६१/२०१३दि.४/५ /२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

'अ' व 'ड' प्रभाग कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणे ( Primary & Secondary Collection) कामासाठी नव्याने निविदा कार्यवाही प्रस्तावित करणेत आलेली आहे. तथापी त्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने सध्याचे मान्य दराने अ-प्रभाग क्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे कामासाठी मे.श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था व मे.रमाबाई स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या २ संस्थांची ५५ Tata Ace वाहनांकरीत ५५ वाहन चालक, ११० कामगार व ४ सुपरयाझर पुरविणेकामी अंदाजपत्रकीय दराने तर ड-प्रभागासाठी ७० वाहनांकरीता ७० वाहन चालक, १४० कामगार व ६ सुपरयाझर पुरविणेकामी मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सह. संस्था यांची अंदाजपत्रकीय रकमेच्या ६.९१८७५ % कमी दराने ठेकेदार म्हणुन दिनांक २५.४.२०१३ पासुन ६ महिने अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत या दोन्हीपैकी जो प्रथम पुर्ण होईल त्या कालावधीसाठी ठेकेदार म्हणुन नेमणुक करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३७१ विषय क्रमांक – ८

दिनांक – २१/५/२०१३ विभाग – मुख्य लेखापरीक्षण

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:-मा.मुख्य लेखा परीक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/४१२/२०१३ दि.४/५/१३

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा

मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३७२ विषय क्रमांक – ९
दिनांक – २१/५/२०१३ विभाग –आरोग्य मुख्य कार्या
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जा.क्र.आमु/४/कावि/१९४/२०१३ दि.७/५/२०१३.

मा. आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३, ब प्रभागाचे कार्यक्षेत्रामध्ये औषध फवारणी करणेकामी मे.मल्हार एन्टरप्रायजेस यांनी ब प्रभागासाठी दिलेला सुधारीत दर र.रू.१,८९५/- (प्रति दिन ८ तास) स्विकृत करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असून त्यानुसार मे.मल्हार एन्टरप्रायजेस या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

(नि.र.रू.६,५५,२००/- र.रू.सहा लाख पंचावन्न हजार दोनशे)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३७३ विषय क्रमांक – १०
दिनांक – २१/५/२०१३ विभाग–आरोग्य मुख्य कार्या
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जा.क्र.आमु/४/कावि/१९१/२०१३ दि.७/५/२०१३.

मा. आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३, अ प्रभागाचे कार्यक्षेत्रामध्ये औषध फवारणी करणेकामी मे.रुतु बायोसिस्टीम यांनी अ प्रभागासाठी दिलेला सुधारीत दर र.रू.१,८७५/- (प्रति दिन ८ तास) स्विकृत करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असून त्यानुसार मे.रुतु बायोसिस्टीम या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. (नि.र.रू.६,५५,२००/- [र.रू.सहा लाख पंचावन्न हजार दोनशे)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३७४ विषय क्रमांक – ११
दिनांक – २१/५/२०१३ विभाग–आरोग्य मुख्य कार्या
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जा.क्र.आमु/४/कावि/१९२/२०१३ दि.७/५/२०१३.

मा. आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३, क प्रभागाचे कार्यक्षेत्रामध्ये औषध फवारणी करणेकामी मे.रुतु बायोसिस्टीम यांनी क प्रभागासाठी दिलेला सुधारीत दर र.रू.१,८२७/- (प्रति दिन ८ तास) स्विकृत करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असून त्यानुसार मे.रुतु बायोसिस्टीम या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. (नि.र.रू.६,५५,२००/- [र.रू.सहा लाख पंचावन्न हजार दोनशे)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३७५ विषय क्रमांक – १२

दिनांक – २१/५/२०१३ विभाग–आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जा.क्र.आमु/४/कावि/१९३/२०१३ दि.७/५/२०१३.

मा. आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३, ड प्रभागाचे कार्यक्षेत्रामध्ये औषध फवारणी करणेकामी मे.रुतु बायोसिस्टीम यांनी ड प्रभागासाठी दिलेला सुधारीत दर र.रू.१,८७५/- (प्रति दिन ८ तास) स्विकृत करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असून त्यानुसार मे.रुतु बायोसिस्टीम या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. (नि.र.रू.६,५५,२००/- [र.रू.सहा लाख पंचावन्न हजार दोनशे)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३७६ विषय क्रमांक – १३

दिनांक – २१/५/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/२६२/२०१३ दि.७/५/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे करसंकलन विभागासाठी आवश्यक संगणक स्टेशनरी छपाई साहित्य खरेदीकामी ई-निविदा क्र.३९/०४/२०१२-१३ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.श्री.साई श्रध्दा प्रिंटर्स,चिंचवड पुणे-१९ यांचे मिळकतकर बिले मनपाचे नमुनयाप्रमाणे ***A/***4 साईज पेपर (210***X***294 ***MM),***80 ***GSM*** बल्लारपूर पेपरवर मल्टीकलरमध्ये दोन्ही बाजूस छपाई साहित्याचे दर एकूण र.रु.५,**५**९,२००/- व मे.रुद्र प्रताप फर्म्स,भोसरी पुणे-२६ यांचे मिळकतकर पावती मनपाचे नमुन्या प्रमाणे कार्बन पेपरसह 8***X***8***X***2 साईज मध्ये छपाई मटेरिअल साहित्याचे दर एकूण र.रु.१,८९,०००/-असे एकत्रित एकूण र.रू.७,४८,२००/- दर स्विकृत करुन**,** करारनामा केलेला असल्याने प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३७७ विषय क्रमांक – १४

दिनांक – २१/५/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/.२६०/२०१३ दि.७/५/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांचे २१०० मेल आय-डी नुतनीकरण करणे,मनपाचे ई-निविदा प्रणालीच्या ***SSL (Security Socet Layer )*** चे नुतनीकरण करणे व मनपाचे वेब पोर्टलचे ***SSL (Security Socet Layer )*** चे नुतनीकरण करणे कामी ई-निविदा क्र.३४/०३/२०१२-१३ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.टेक ९ सर्व्हीसेस चिंचवड, पुणे-३३ यांचे २१०० ई-मेल आयडी नुतनीकरण व मनपाचे ई-निविदा प्रणालीच्या ***SSL (Security Socet Layer )*** चे नुतनीकरण करणे तसेच मनपाचे वेब पोर्टलचे ***SSL (Security Socet Layer )*** नुतनीकरण करणे एकूण ३ बाबी साहित्याचे दर एकूण र.रू.७,४१,३३०/- दर स्विकृत करुन, करारनामा केलेला असल्याने प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बारणे माया संतोष)
**सभाध्यक्ष**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/४७७/२०१३
दिनांक - २२/०५/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.